CMYK

वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य - मुख्यमंत्री शिंदे >> पान 2

मनोज जरांगेंसोबतच्या वादानंतर राजेंद्र राऊतांचे विधानसभा अध्यक्षांना पत्र >> पान 3

३ मृतदेह झोळीत टाकले अन् ८ किलोमीटरची पायपीट, 'त्या' गावात नक्की काय झालं? >> पान 4

**सुविचार**

लोकांचे तुमच्याबद्दल काय मत आहे यापेक्षा तुमचे स्वतःबद्दल काय मत आहे हे महत्त्वाचे.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 33 ■ सोमवार, दि. 09 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत, चित्रा वाघ यांची हात जोडून गणरायाकडे प्रार्थना

आतील पान

# जागा वाटपावर आज शिक्कामोर्तब होणार?

## अमित शाहांच्या उपस्थितीत महायुतीचे राजकीय खलबते



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :भाजपच्या गोटातून एक मोठी बातमी हाती आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने महायुतीत राजकीय खलबतं होत असल्याचे चित्र आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आजपासून दोन दिवस मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यानिमित्य अमित शहाची आज रात्री महायुतीच्या प्रमुख नेत्यांसोबत महत्वाची बैठक होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. सह्याद्री अतिथिगृहावर रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवारांसह महायुतीच्या महत्वाच्या नेत्यांसोबत अमित शहांची बैठक होणार आहे. तर या बैठकीला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेही उपस्थित राहणार आहे. विधानसभेच्या जागावाटपासह महत्वाच्या विषयांवर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

जागा वाटपावर

आज शिक्कामोर्तब होणार?

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. यंदाची विधानसभा निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे. या वर्षी ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीसाठी भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीनं अद्याप आपला फॉर्म्युला निश्चित केलेला नाही. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच आगामी विधानसभेतही भाजपनं महायुतीतील घटक पक्षांपेक्षा जास्त जागा लढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. दरम्यान, सध्या महाराष्ट्राच्या विधानसभेत भाजप सर्वाधिक आमदार असलेला पक्ष आहे. भाजपकडे १०५ आमदार आहेत. महायुतीत भाजपसोबत अजित पवारांची राष्ट्रवादीची काँग्रेस आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना हे दोन पक्ष आहेत.

गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक राजकीय भूकंप झाल्याचं पाहायला मिळालं आहे. सर्वात आधी शिवसेनेतील अंतर्गत बंडाळी, त्यानंतर सत्तेत असलेलं महाविकास आघाडी सरकार कोसळणं, शिंदेंनी भाजपच्या साथीनं महायुती सरकार स्थापन करुन स्वतः मुख्यमंत्रीपदी विराजमान होणं, त्यानंतर अजित पवारांच्या बंडानंतरची राष्ट्रवादीतील फूट, तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी थेट शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ठोकलेला दावा. यासर्व घडामोडी राज्याच्या राजकारणाला हादरे देणाऱ्या ठरल्या. त्यामुळे ज्या मतदार राजानं हे राजकीय हादरे झेलले, तो मतदार राजा यंदा राज्याचं सिंहासन कुणाच्या हवाली करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादीतील अंतर्गत बंडाळीनंतर राज्यातील समीकरणं बदलली आहेत. पण, यंदाच्या विधानसभेत खरी लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यातच रंगल्याचं पाहायला मिळणार आहे. महाराष्ट्रातील मागील विधानसभा निवडणुका ऑक्टोबर २०१९ मध्ये झाल्या होत्या. त्यामुळे नवी विधानसभा त्यापूर्वीच अस्तित्वात येणे अपेक्षित आहे. येत्या सप्टेंबर किंवा ऑक्टोबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूक होऊ शकतात.

# पूर्व विदर्भात भाजपला मोठा धक्का!

## पुन्हा एका माजी आमदाराचा राजीनामा

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी** : भाजपच्या गोटातून एक बातमी समोर आली आहे. पूर्व विदर्भात भाजपला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे. काँग्रेसकडून ३ वेळा विधानसभा आणि २ वेळा विधानपरिषद सदस्य राहिलेले, तसेच सध्या भाजपमध्ये असलेले माजी आमदार गोपाल अग्रवाल यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. तर येत्या १३ सप्टेंबरला काँग्रेसमधे घरवापसी करनार असल्याची माहिती स्वत: गोपाल अग्रवाल यांनी दिली आहे. पत्रकार परिषदे घेत त्यांनी ही माहिती दिली आहे.



गोंदिया विधानसभा येथील माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकी दरम्यान काँग्रेसमधून महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र माजी आ. गोपालदास अग्रवाल हे पुन्हा काँग्रेसमध्ये घर वापसी करणार असल्याचे संकेत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ते भाजपमध्ये अस्वस्थ होते. अखेर आज पत्रकार परिषद घेत त्यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

### दोन महिन्यात पुन्हा एका माजी आमदाराचा राजीनामा

विशेष म्हणजे दोन महिन्यापूर्वीच माजी आमदार रमेश कुथे यांनी भाजपमधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यानंतर पुन्हा एक माजी आमदार आणि भाजपला सोडचिट्ठी दिल्याने पूर्व विदर्भात भाजपला मोठा धक्का समजला जात आहे. विशेष म्हणजे गोपाल अग्रवाल यांच्या पत्रकार परिषदेमध्ये काँग्रेसचे आमदार सहसराम कोरोटे, काँग्रेस जिल्हा अध्यक्ष दिलीप बनसोड, काँग्रेस पदाधिकारी यांची उपस्थिती असल्याने ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार हे मात्र निश्चित झाले आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यामध्ये भाजपाला पुन्हा एक मोठा धक्का बसला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार अशी चर्चा होती. मात्र, आता दिल्लीवरून त्यांच्या पक्ष प्रवेशाला ग्रीन सिग्नल मिळाल्याची माहिती आहे. गोपाल अग्रवाल हे काँग्रेसकडून २ वेळा विधानपरिषद तर ३ वेळा विधानसभेचे सदस्य राहिलेले आहेत. मात्र २०१९ च्या निवडणुकी दरम्यान त्यांनी मोदी लाटेत भाजपमध्ये प्रवेश केला होता. दरम्यान, त्यावेळी त्यांना भाजपने उमेदवारी ही दिली होती. मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर ते भाजपात अस्वस्थ होते. अखेर त्यांनी आज भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून काँग्रेसमध्ये घरवापसी करणार असल्याची माहिती दिली आहे.

# हेच मराठे मनोज जरांगेंचे कपडे फाडल्याशिवाय गप्प बसणार नाहीत; प्रसाद लाड यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजप नेते आणि विधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली आहे. जरांगे पाटील हा शरद पवार आणि महाविकास आघाडीचा माणूस आहे. मनोज जरंगेंच्या वक्तव्यांना मस्ती अन् माज नाही म्हणायचे, तर अजून काय म्हणायचे? मराठा समाजाला खड्ड्यात घालण्याचे



काम मनोज जरांगे पाटलांनी केले त्यामुळे एक दिवस हेच मराठे मनोज जरांगेंचे कपडे फाडल्याशिवाय गप्प बसणार नाहीत अशा शब्दात प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

याबाबत प्रसाद लाड यांनी आपल्या ट्विटर अकाउंट वर एक विडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये ते म्हणतात, ज्या पद्धतीने मनोज जरांगे पाटलांची वक्तव्ये येत आहेत. याला मस्ती आणि माज नाही म्हणायचं तर अजून काय म्हणायचं? विरोधात बोलणारं प्रत्येक जण देवेंद्र फडणवीसांचा माणूस आहे, भाजपचा माणूस >> पान ४

# महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ! अजित पवार विधानसभा लढवणार नाहीत?



दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी बातमी बारामतीतून येत आहे. उपमुख्यमंत्री आणि बारामती विधानसभेचे विद्यमान आमदार अजित पवार यांनी आगामी विधानसभा निवडणूक न लढवण्याची थेट संकेत दिले आहेत. तसेच जो कोणी दुसरा आमदार होईल त्याची आणि माझ्या कामाची तुलना करा असं अजित पवारांनी म्हंटल आहे. आज बारामतीमध्ये एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी आपल्या भाषणातून खळबळ उडवून दिली आहे. तसेच इतकी विकासकामे करूनही बारामती लोकसभेत आमचा पराभव झाला अशी खंतही अजित पवारांनी मांडली.

अजित पवार म्हणाले, आपण लाखोंच्या मतांनी निवडून येणारी माणसे आहोत. मी आता ६५ वर्षांचा झालो आहे. मी समाधानी आहे. मात्र जेथे पिकते तेथे विकत नाही. त्यामुळे बारामतीला माझ्याशिवाय नेतृत्व मिळालं पाहिजे. बारामतीकरांना मी सोडून आमदार मिळाला पाहिजे. त्यानंतर १९९१ ते २०२४ च्या काळात माझ्या कारकिर्दीची आणि त्याच्या कारकिर्दीची तुलना करा. बारामतीकराना सगळं काही न मागता मिळालं. न सांगता >> पान ४

# मनोज जरांगे-धनंजय मुंडेंची गुप्त भेट

## लोकसभेतील फटका विधानसभेमध्ये बसू नये यासाठी मुंडेंची हालचाल?

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : मध्यरात्री राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि मराठा आरक्षणाचा लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांची भेट झाली. अर्थात ही गुप्त भेट सकाळ होताच उघड झाली. ही भेट झाल्याची जरांगे पाटलांनी कबूलसुद्धा केले. मात्र धनंजय मुंडे यांनी मात्र अशी भेट झालीच नसल्याचे सांगितले. मनोज जरांगे आणि धनंजय मुंडेंच्या या गुप्त भेटीनंतर बीडसह मराठवाड्याच्या राजकारणावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

परळीतील नाथ प्रतिष्ठानच्या सार्वजनिक गणेश मंडळाचे धुमधडाक्यात आगमन झालं. रात्री साडेदहा ते



साडेअकरा वाजेपर्यंत धनंजय मुंडे यांच्या या व्यासपीठावर 'पुष्पा' फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना, क्रिती सेनन यांच्यासोबतच राज्यातील दिग्गज कलावंत सहभागी झाले होते. खरं तर हा कार्यक्रम जरी गणेश उत्सवाचा असला तरी धनंजय मुंडे यांनी मात्र त्यांच्यावर टीका करणाऱ्याला या भाषणात झोडून काढले.

परळीच्या कार्यक्रमानंतर अंतरवालीकडे गाड्यांचा ताफा वळला

अर्थात हा सगळा कार्यक्रम सगळ्या समोरच फुलला होता. मात्र त्यानंतर रात्री १२ वाजताच धनंजय मुंडे यांच्या ताफ्यातील गाड्या अंतरवली सराटीकडे वळल्या. यावेळी कुणालाच माहीत नव्हते की आता मनोज जरांगे पाटलांना भेटायला जायचे आहे. दोन तासात धनंजय मुंडे अंतरवाली सराटीला पोहोचले. आंतरवालीच्या सरपंचाच्या घरी धनंजय मुंडे थांबले आणि थोड्याच वेळात मनोज जरांगे पाटील हे त्या ठिकाणी आले. यावेळी धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये बरीच चर्चा झाली.

या भेटीमध्ये इतकी गुप्तता पाळण्यात आली होती ती या ठिकाणी कुणीही फोटो काढला नाही अथवा व्हिडिओ घेतला नाही. मात्र तिकडे दिवस उजाडला आणि या भेटीची चर्चा सुरू झाली. अर्थात मनोज जरांगे पाटील यांनी ही भेट झाली असल्याचे स्पष्ट सांगितले. मात्र अद्यापही धनंजय मुंडे यांनी अशी भेट झालीच नाही या मतावर ठाम आहेत. या भेटीचा टायमिंग सुद्धा >> पान ४






CMYK

## महाराष्ट्राला फडणवीसांची गरज...

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे भूषण आहेत. ते अभ्यासू, परिश्रमी आहेत. सोबतच समर्पित भावनेने काम करणारे लोकसेवक आहेत. त्यांचा कामाचा धडाका जबरदस्त आहे. त्यांच्याकडे महाराष्ट्राला पुढे नेण्याची दृष्टी आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्राने सर्व आघाड्यांवर मोठी झेप घेतली होती. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वात २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला १०५ जागा मिळाल्या होत्या. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेसोबत युती करून फडणवीसांनी पुन्हा युतीला कौल मिळवून देण्यात यश प्राप्त केले होते. एकप्रकारे मुख्यमंत्री असताना केलेल्या कामांची ही पावतीच होती. पण, उद्धव ठाकरे यांच्या मनात पाप आले आणि त्यांनी देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री बनू दिले नाही. ज्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीला जनतेने नाकारले होते, त्यांच्या तंबूत जाऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. पण, ठाकरेंच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्र विकासाच्या मार्गावरून माघारी फिरल्याचा अनुभव आपण सगळ्यांनीच घेतला. दिवस पुढे जात असतानाच राज्यात राजकीय गणितं बदलली आणि पुन्हा एकदा भाजपा सत्तेत आली. देवेंद्र फडणवीसांनी मनाचा मोठेपणा दाखवत उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले आणि राज्याला नव्या दमाने समृद्धीच्या महामार्गावर गतिमान केले. आज अनेक राज्यांना पिछाडीवर सोडत महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणूक आणण्यात आघाडीवर असल्याचे सुखावणारे चित्र दिसत आहे. देशात एकूण जी थेट परकीय गुंतवणूक आली आहे, त्यातली ५२.४६ टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात आली आहे. याचे श्रेय भाजपा-शिवसेना-राकाँ (अजित) यांना आहेच, प्रामुख्याने ते सर्वाधिक यशस्वी मुख्यमंत्री राहिलेल्या आणि आता उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीसांना आहे. ही अतिशयोक्ती नाही.. विधानपरिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीत जास्तीची जागा जिंकताना जे कौशल्य फडणवीसांनी दाखविले होते, तसेच कौशल्य त्यांनी थेट विदेशी गुंतवणूक आणतानाही दाखविले, यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत. महाराष्ट्र हे तसे लोकसभेतील खासदारांच्या संख्येच्या दृष्टीने देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. उत्तरप्रदेशातील ८० खासदारांच्या पाठोपाठ महाराष्ट्रात ४८ खासदार आहेत. मात्र, आर्थिक स्थिती, कायदा आणि सुव्यवस्था, औद्योगिक विकास, राजकीय स्थैर्य तसेच विकासाच्या अन्य सर्व प्रस्थापित मापदंडावर महाराष्ट्र हे देशात सर्वांत पुढे आहे. महाराष्ट्राने देशाच्या विकासातही आपले बहुमोल असे योगदान दिले आहे. आज महाराष्ट्रातील जनतेची मान अभिमानाने उंचावेल, अशी माहिती समोर आली आहे. गेल्या लागोपाठ दोन वर्षांपासून महाराष्ट्र देशातील गुंतवणुकीत आघाडीवर आहे. एप्रिल ते जून २०२४ या तिमाहीत महाराष्ट्रात ७०, ७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. या तिमाहीत देशभरात १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपयांची गुंतवणूक आली; यापैकी ७०,७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रातील आहे. गुंतवणुकीत दुसऱ्या स्थानावर कर्नाटक आहे. कर्नाटकात १९,०५९ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. मात्र, महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांतील गुंतवणुकीत मोठी तफावत आहे. देशात पहिल्या दहांपैकी महाराष्ट्र सोडून उर्वरित नऊ राज्यांतील गुंतवणुकीची बेरीजही महाराष्ट्रातील गुंतवणुकीपेक्षा कमी आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असले तरी महायुतीच्या राज्यातील सरकारच्या ड्रायव्हिंग सीटवर देवेंद्र फडणवीसच आहेत. फडणवीस यांच्यामुळेच महायुती सरकारच्या विकासाची गाडी भरधाव वेगाने योग्य मार्गावर धावत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा अभ्यासू, संवेदनशील, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला, प्रखर वक्तृत्व, विकासाची दृष्टी तसेच प्रशासनावर पकड असलेला नेता मिळाला, हे महाराष्ट्राच्या जनतेचे भाग्यच म्हटले पाहिजे. कारण, गुंतवणूक, त्याही परकीय गुंतवणूक ही उगीच कोणत्याही राज्यात येत नाही. गुंतवणूक करणारा मग तो देशातील असो वा परदेशातील उद्योगपती, तो डोळे झाकून गुंतवणूक करत नाही. गुंतवणुकीच्या दृष्टीने कोणते राज्य सुरक्षित आणि उद्योगस्नेही आहे, त्या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था कशी आहे, राज्य सरकारची उद्योगांबाबतची भूमिका कशी आहे, या घटकांचा अभ्यास करूनच तो गुंतवणूक करीत असतो. महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक आली, याचा अर्थ महाराष्ट्रातील एकूणच सगळे वातावरण देशातील आणि परदेशातील गुंतवणूकदारांनाही पसंत पडले, असा होतो. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात १,१८,४२२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. या वर्षातही महाराष्ट्रातील गुंतवणूक दिल्ली, कर्नाटक आणि गुजरातच्या बेरजेपेक्षाही जास्त होती. २०२३ - २४ मध्ये महाराष्ट्रात १,२५,१०१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. महाराष्ट्राची गुंतवणूक गुजरातच्या दुप्पट तर गुजरात आणि कर्नाटकच्या बेरजेपेक्षा जास्त होती. २०१४ ते २०१९ या काळात म्हणजे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात ३,६२,१६१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती. सव्वादोन वर्षांपूर्वी राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर पाच वर्षांचे काम आम्ही अडीच वर्षांत करू, अशी ग्वाही राज्य सरकारने दिली होती. सव्वादोन वर्षांत राज्यात ३,१४,३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. याचे सारे श्रेय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे जात असले, तरी यात सिंहाचा वाटा हा देवेंद्र फडणवीस यांचा आहे. हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. जेवढी गुंतवणूक जास्त तेवढे मोठे उद्योग राज्यात येण्याची शक्यता जास्त आणि जेवढे मोठे उद्योग राज्यात येतील, तेवढ्याच मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होतील. आपल्या राजकीय प्रवासात फडणवीस यांनी राज्यातील सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेत त्यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाचा मार्ग प्रशस्त केला. पण जातपात न मानणाऱ्या फडणवीसांना जातीवरून अडचणीत आणण्याचे सातत्याने प्रयत्न झाले आणि अजूनही होत आहेत, हे दुर्दैवीच देवेंद्र फडणवीस पहिल्या कार्यकाळात मुख्यमंत्री झाले असताना महाराष्ट्रात मराठ्यांनी लाखांचे मोर्चे काढले. आज फडणवीस मुख्यमंत्री नसले, उपमुख्यमंत्री असले, तरी काही स्वार्थी शक्तींनी मनोज जरांगे पाटील यांना पुढे करून मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून त्यांना घेरण्याचा प्रयत्न चालवला आहे. खरं म्हणजे राज्यातील मराठ्यांना आरक्षण देणारे फडणवीसच आहेत. पण दुर्दैवाची बाब म्हणजे त्यांना मराठाविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आधी देश, मग पक्ष आणि सर्वात शेवटी व्यक्ती यावर फडणवीस यांची ठाम श्रद्धा आणि निष्ठा आहे. महाराष्ट्रात येत्या महिना-दोन महिन्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असले, तरी महायुती भाजपाच्या नेतृत्वात निवडणुकीला सामोरी जाणार आहे. महायुतीचा मुकाबला महाविकास आघाडीशी आहे. या लढतीत महायुतीचा विजय एकशेएक टक्के निश्र्चित आहे. महायुती आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करणार नसली, तरी महायुतीत सर्वाधिक जागा भाजपा लढवणार आणि सर्वाधिक जागा भाजपा जिंकणार, ही काळ्या दगडावरची रेष आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर सर्वात जास्त आमदार भाजपाचे राहणार असल्यामुळे मुख्यमंत्रिपद ओघानेच भाजपाकडे येणार, हे नक्की आहे. फडणवीस हे महाराष्ट्राची आन, बान आणि शान आहेत. आज फडणवीसांना मुख्यमंत्रिपदाची गरज नाही, तर महाराष्ट्राला फडणवीस यांची मुख्यमंत्री म्हणून गरज आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. जे लोक भाजपाला जातीयवादी म्हणून हिणवतात, तेच लोक फडणवीसांना त्यांच्या जातीवरून त्रास देत आहेत, ही विडंबनाच होय. स्वतःला पुरोगामी म्हणविणारे पवारादी नेते गेल्या काही कालावधीत स्वत:च प्रचंड जातीवादी झालेत, हे महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी बघतो आहे.

# वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य - मुख्यमंत्री शिंदे

## ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर यांचा ९३ वा आणि ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांचा ७० वा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ








**पुणे/प्रतिनिधी** : वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा, सन्मार्गाची दिशा दाखविणारा असून समाज घडविण्याचे कार्य वारकरी संप्रदाय करतो, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आळंदी येथे फ्रुट वाले धर्मशाळा येथे झालेल्या ह.भ.प मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या व ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते ह.भ.प कुरेकर महाराज यांना शांतीब्रह्म पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना तुलसीदास पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच संतपूजन करण्यात आले.

कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. संदीपान महाराज शिंदे (हासेगावकर), ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार प्राप्त ह. भ. प. संजय महाराज पाचपोर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, आजचा कार्यक्रम आपल्या आयुष्यातला आगळा वेगळा कार्यक्रम आहे. संतांचे पूजन करणे यापेक्षा वेगळे भाग्य नाही. ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर, ह.भ.प. रामराव महाराज ढोक आणि वारकरी संस्थेचे योगदान मोठे आहे. शिकवणाऱ्याला मानधन नाही आणि शिकणाऱ्यालाही शुल्क नाही अशी जगात नसेल अशी ही संस्था आहे. १०७ वर्षे झालेली ही संस्था आपले नाव जपण्याचे काम करत आहे. एक पिढी घडविण्याचे काम ही संस्था करत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी संस्थेचा आणि ह.भ.प. कुरेकर महाराज आणि ह.भ.प. ढोक महाराज यांचा सन्मान केला. वारकरी मंडळ, वसतिगृह यातील तांत्रिक अडचणी लवकरच दूर करण्यात येईल, असेही आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले.

गेल्या २ वर्षात शासनाने ६०० च्यावर निर्णय घेतले, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही नियोजन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. आपणदेखील सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आहे. आपल्यालाही गरिबी माहिती आहे. आपल्या स्तरावरचे अर्थकारण सांभाळणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते. म्हणून ही योजना सुरू केली. माझी लाडकी बहिण योजनेसाठी वर्षभराची तरतूद केली असून दरमहा निश्र्चित रक्कम मिळणार आहे. या योजनेबरोबरच लेक लाडकी लखपती योजना, मुलींना व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, एस. टी. प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना आदी योजना राबवित आहे.

त्यांनी पुढे सांगितले, शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ आदींसाठी आतापर्यंत १६ हजार कोटी रुपये नुकसान भरपाई दिली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीला राज्याच्या नमो महासन्मान योजनेची ६ हजार रुपयांची जोड देऊन वर्षाला एकूण १२ हजार रुपये देण्यात येत आहेत. १ रुपयात पीक विमा देणारे हे देशातील पहिले सरकार असून ७.५ एच. पी. पर्यंतच्या शेतीपंपाचे वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य शासनाने एकीकडे बंद पडलेले प्रकल्प सुरू केले. पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक, अटल सेतू असे विकासाचे प्रकल्प राबवित असून हाताला रोजगार मिळण्याच्या दृष्टीने नवीन उद्योग आणण्याचे काम केले जात आहे. महाराष्ट्र उद्योग, परदेशी गुंतवणुकीमध्ये आघाडीचे राज्य असून देशातील एकूण परदेशी गुंतवणुकीपैकी ५२ टक्के परदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे, असे ते म्हणाले.

लाडकी बहीण योजनेबरोबर लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यक्रम सुरू केला आहे. त्यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण तसेच विद्यावेतनही मिळणार आहे. यात आतापर्यंत १ लाख ५० हजार उमेदवारांनी अर्ज भरले असून त्यांना नियुक्ती पत्रे दिली आहेत. त्यामुळे एकीकडे विकास कार्य आणि दुसरीकडे कल्याणकारी योजना अशी सांगड घालण्याचे काम सरकार करत आहे.

सरकार राज्यातील सर्वसामान्यांना सुविधा देण्याचे काम करत आहे. गड किल्ल्यांच्या विकास, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण शासनाने हाती घेतले आहे. चंद्रभागा, इंद्रायणी, गोदावरी या नद्यांच्या प्रदूषण मुक्तीचे आराखडे करत आहोत. महाराष्ट्राला शेती, सिंचन, शिक्षण, उद्योग, आरोग्य, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान आदींमध्ये आधुनिक बनविण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, राज्यात वारकरी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. प्रत्येक दिंडीला अनुदान, वारकरी बांधवांसाठी साहित्य याशिवाय येणाऱ्या काळात किर्तनकारांना सन्मान निवृत्तीवेतन योजना सुरू करण्यात येणार आहे. त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून पुढील काम सुरू आहे, असेही ते म्हणाले.

ह.भ.प. मारोती महाराज कुरेकर म्हणाले, संतांच्या शिकवणीचा, वाङमयाचा विसर पडू नये यासाठी काम करणारी ही वारकरी शिक्षण संस्था आहे. वारकऱ्यांना आध्यात्मिक समाधान मिळवून देण्यासाठी संस्था कार्य करत आहे. संस्थेच्या गरजा शासनामार्फत पूर्ण होतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

ह.भ.प. रामराव महाराज ढोक म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारकऱ्यांच्या सन्मान केला. हजारो कीर्तनकार निर्माण करण्याचे काम शांतिब्रह्म ह.भ.प. मारोती महाराज कुरेकर यांनी केले. या संस्थेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. शासन रस्ता तयार करते, त्यावर कसे चालावे हे वारकरी संप्रदाय शिकवतो, असेही ते म्हणाले.

इतर कार्यक्रमात आयोजकांच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत होते. मात्र या कार्यक्रमात ज्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा होत आहे अशा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तेच ह.भ.प मारुती महाराज कुरेकर, ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्यासह वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले, हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

ह. भ. प. बाळकृष्ण महाराज शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी नतूसिंग राजपूत यांनी लिहिलेल्या वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने प्रकाशित सार्थ गाथेच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायातील मान्यवर, वारकरी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी संस्थान समितीच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची प्रतिमा देऊन मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथ आदी उपस्थित होते.

## पाकिस्तानला समुद्रात सापडलं घबाड; आर्थिक स्थिती सुधारणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : या आपल्या शेजारील देशाची आणि कट्टर विरोधकांची भुके मरे अवस्था आपल्याला माहीतच आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती खूपच खालावली असून देशात महागाईने उच्चांक गाठला आहे. मात्र याच दरम्यान, पाकिस्तानी जनतेच्या चेहऱ्यावर हसू आणणारी घटना घडली आहे. पाकिस्तानला समुद्रात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचा मोठा साठा सापडला आहे. हा साठा जगातील सर्वात मोठा चौथा मोठा साठा असून यामुळे पाकिस्तानची आर्थिक स्थिती निश्र्चितच सुधारू शकते. याशिवाय अनेक देशांतील महागड्या तेलाचा प्रश्र्नही सुटू शकतो असं बोलले जातंय. बिझनेस टुडेवर प्रकाशित झालेल्या डॉन न्यूजच्या वृत्तानुसार, पाकिस्तानचा हा शोध (पीएके जिओग्राफिक सर्व्हे) तीन वर्षांनंतर पूर्ण झाला आहे. एका मित्र देशाच्या सहकार्याने पाकिस्तानने हा प्रचंड साठा शोधला आहे. एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, भौगोलिक सर्वेक्षणातून या ठिकाणाची ओळख पटली असून संबंधित विभागाने पाकिस्तानच्या सागरी क्षेत्रात या शोधांची माहितीही सरकारला दिली आहे.एका अधिकाऱ्याने या उपक्रमाला 'ब्लू वॉटर इकॉनॉमी'चा फायदा घेण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल म्हटले आहे. बिडिंग आणि एक्सप्लोरेशनच्या प्रस्तावावर विचार केला जात असल्याचे त्यांनी सूचित केले, यावरून त्याचा आकार निश्र्चित करण्याचे आणि शोधण्याचे काम लवकरच सुरू होऊ शकते. परंतु ड्रिलिंग आणि तेल काढण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात, असेही या अधिकाऱ्याने सांगितले. पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅसव्यतिरिक्त या समुद्रातून अन्य मौल्यवान खनिजा आणि तत्वे मिळण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा घेण्यासाठी लवकरात लवकर पुढील कारवाईवर जोर देण्यात येणार आहे असेच अधिकऱ्यानी सांगितले.

# लव्ह जिहाद थांबेना! कट्टरपंथी युवकाकडून हिंदू युवतीला धर्मांतरण करण्यास जबरदस्ती

लखनऊ : अल्पवयीन हिंदू मुलीवर कट्टरपंथी तरूणाने बलात्कार करत मुलीचे धर्मांतरण करण्यास जबरदस्ती केली. हा धक्कादायक प्रकार उत्तर प्रदेशातील आग्रा जिल्ह्यात घडला असून आणखी एक लव्ह जिहादचे प्रकरण आढळून आले. याप्रकरणात मुख्य आरोपी आमिर असून पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. ही घटना ७ सप्टेबर २०२४ रोजी घडली.

ही घटना आग्रा येथील ताजगंज पोलीस ठाणे परिसरात घडली आहे. इयत्ता ९ वीत शिक्षण घेत असलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत हा प्रकार घडला आहे. शनिवारी पीडित

## बजरंग दलाने उचलले मोठे पाऊल

मुलगी शिकवणीच्या तासाला घरातून निघाली मात्र बऱ्याच वेळानंतर ती पुन्हा घरी परतली नाही. आमिर नावाचा कट्टरपंथी तरूणाने आपले नाव लपवून आपली राजा नावने ओळख करून हिंदू पीडितेची दिशाभूल करून तिचे लैंगिक शोषण केले. शनिवारी तो पीडितेसोबत शहरातील एका हॉटेलात गेला त्यावेळी हे प्रकरण घडले.

याप्रकरणावरून पीडितेच्या वडिलांनी हिंदू संघटनांकडे घडलेल्या घटनेबाबत मदत मागितली. राष्ट्रीय बजरंग दलाच्या सहाकाऱ्यांसह पीडितेच्या वडिलांसोबत गेले आणि सर्वजण घटनास्थळी पोहोचले. यावेळी ही घटना उघडकीस आली असून आमिर पीडितेसोबत आतमध्ये बंद खोलीत दिसला होता. पीडित मुलगी तिच्या वडिलांसोबत घरी गेली होती. बजरंग दल या हिंदुत्ववादी संघटनांच्या काही कार्यकर्त्यांनी आमिरला




पोलिसांच्या ताब्यात दिले आणि याप्रकरणात आमिरविरोधात एफआऱआय़ दाखल करण्यात आली होती.

तक्रारीनुसार पीडितेच्या वडिलांनी सांगितले की, आमिरने आपल्या मुलीला अनेकदा ब्लॅकमेल करत धर्मांतरण स्वीकारण्याचा कट रचल्याचे आरोप केले. यामुळे आमिरविरोधात भारतीय न्यायसंहिता कलम ६५ (१) तसेच पोक्सो कायद्यांतर्गत बेकादेशीर धार्मिक परिवर्तन प्रतिंबध कायद्यानुसार एफआऱ नोंदवला गेला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मनोज जरांगेसोबतच्या वादानंतर राजेंद्र राऊतांचे विधानसभा अध्यक्षांना पत्र

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** :मागच्या दोन दिवसांपासून मनोज जरांगे पाटील आणि बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. राऊत यांनी आव्हान देताच जरांगे पाटील यांनी बार्शीतून भेटायला आलेल्या लोकांसमोर बोलताना राऊत यांना प्रतिआव्हान दिले आहे. तसेच,लवकरच बार्शीत येऊन राजेंद्र राऊतांना प्रत्युत्तर देण्यात येईल,असे जरांगे पाटील यांनी सांगितले होते.

जरांगे पाटील यांच्यासोबत वादानंतर आमदार राजेंद्र राऊत यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने राज्यात विविध मागण्या पुढे येत आहेत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, ही प्रमुख मागणी आहे. त्यावरून राजकारणही मोठ्या प्रमाणात सुरु आहे. या मागणीमुळे मराठा समाज-ओबीसींमध्ये वाद निर्माण होत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी तातडीने विशेष अधिवेशन बोलवावे,अशी मागणी आमदार राजेंद्र राऊत यांनी पत्राद्वारे केली आहे.



काही जिल्ह्यांत तर ओबीसींना मराठ्यांनी बोलायचे नाही. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायचे नाही. हॉटेल,पानटपरी, दुकानं अशा ठिकाणी एकमेकांच्या दुकानात माल खरेदी करायचे नाही,असे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अशा प्रकारांमुळे मणिपूरसारखी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण होते की काय,अशी शंका निर्माण होऊ लागली आहे,असे राऊत यांनी म्हटले आहे. ते म्हणाले,राजकीय पक्ष वेगळी भूमिका घेतात.

त्यामुळे दूध का दूध आणि पाणी का पाणी होण्यासाठी प्रत्येक आमदारांनी आपली भूमिका विधान भवनाच्या माध्यमातून राज्यातील जनतेसमोर मांडावी. ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण द्यावे की नाही द्यावे,यावर आपल्या भावना व्यक्त कराव्यात. ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण देऊ नये,असे प्रतिज्ञापत्र देऊन आम्हाला ओबीसीतून नको,असे सरकारला कळवावे.



आपला पक्ष व व्यक्तीशः प्रत्येक आमदारांनी आपली भूमिका राज्यासमोर मांडावी. राज्यातील सर्व पक्षांच्या प्रमुखांना मी याबाबत पत्र लिहिणार आहे.तसेच, प्रत्यक्षही जाऊन भेटणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान चर्चा करून निर्णय घ्यायचे. त्याच पद्धतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मराठा समाज बांधवांची सह्याद्री अतिथीगृहावर बैठक बोलवावी,अशी मागणी राजेंद्र राऊत यांनी केली. ते म्हणाले,मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळणार की नाही,यासाठी नामवंत वकिलांची फौज उभी करावी. राज्यातील सर्व आम्ही मराठा आमदार वकिलांची फी देऊ. ती बैठक संपूर्ण महाराष्ट्रात लाईव्ह करण्याची जबाबदारीही आम्ही घेऊ.

## संक्षिप्त...


### अंबरनाथमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग! नागरिकांनी बेदम चोप देत आरोपीला दिले पोलिसांच्या ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** :शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका नराधमाने अल्पवयीन चिमुकलीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना शनिवारी घडली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात विनयभंग आणि पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अंबरनाथ पूर्वेच्या शिवजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नराधमाने सहा वर्षीय चिमुकलीचा विनयभंग केल्याचा प्रकार घडकीस आला. पीडित मुलीने आरडाओरडा केल्याने नागरीकांनी तात्काळ आरोपीला पकडून बेदम चोप देत पोलीसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आरोपीवर विनयभंग सह पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक भगत यांनी दिली.

### नवी मुंबई मध्ये दीड दिवसांच्या गणरायाचे गाजतवाजत विसर्जन



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : राज्यभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. गणेशभक्त भक्तिभावेने गणरायाची सेवा करतात. यंदा ७ तारखेला आगमन झालेल्या गणरायामध्ये नवी मुंबई शहरात आणि गावागावात आनंदाचे वातावर आहे. परंपरेनुसार यंदाचा गणेशोत्सव देखील आनंदात साजरा होत आहे.

तसेच दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन गाजतवाजत झाले. काही नागरिकांनी घरच्या घरी बाप्पाचे विसर्जन केले तर काहींनी नदी व तळ्यामध्ये बाप्पाला अखेरचा निरोप दिला. ढोलताशांच्या गजरात बाप्पाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सर्व नागरिकांनी गणपती बाप्पाला अखेरचा निरोप देत गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करत गणरायाचे विसर्जन केले.

### मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना मी माझ्या जिल्ह्याची परिस्थिती सांगणार आहे-अब्दुल सत्तार



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** :मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना मी विनंती केली आहे.सर्वांच्या विनंतीनुसार त्या बहिणीने सलायन लावून घेतली पण तिची परिस्थिती अतिशय नाजूक आहे, ॲडमिट करायची गरज आहे शेवटी ही तिची लढाई आहे पण जोपर्यंत आम्हांला कुणबी म्हणून रिझर्वेशन मिळणार नाही, तोपर्यंत मी उपोषण मागे घेणार नाही.आपण त्या बहिणीला एवढीच विनंती करणार की, त्यांनी त्यांच्या तब्येतीवर उपचार करून घ्यावे मी आज रात्री मुंबईला जाईल आणि उद्या अंतिम निर्णय घेईल

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावतीने दिल्लीत राजदूतांना गणेशमूर्ती आणि उकडीचे मोदक भेट

नवी दिल्ली : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने नवी दिल्लीत विविध देशांच्या राजदूतांना गणेशोत्सवानिमित गणेशमूर्ती आणि उकडीचे मोदक भेट देण्यात आले. मुख्यमंत्र्यांचे दिल्लीस्थित जनसंपर्क अधिकारी अभिषेक जाधव यांनी विविध देशांच्या दूतावासांना प्रतिकात्मक श्रीगणेशाची मूर्ती भेट दिली. अनेक देशाच्या राजदूतांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महाराष्ट्राचे आभार मानले.

गणेश चतुर्थी आणि गणेशोत्सव महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. विविध देशांचे सर्वोच्च प्रतिनिधी म्हणून सर्व देशांचे राजदूत नवी दिल्लीत कार्यरत असतात. गणेशोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे उकडीचे मोदक आणि श्रीगणेशाची मूर्ती भेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने विविध देशांच्या राजदूतांना देण्यात आली. एकमेकांच्या संस्कृतीची देवाणघेवाण व्हावी, महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख साऱ्या जगाला व्हावी म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला.

## सार्वजनिक गणपती मंडळ आरेगाव येत आरतीचा मान



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : सार्वजनिक गणपती मंडळ आरेगांव येथे गणरायाच्या आरती साठी मेहकर मतदार संघाच्या इच्छुक उमेदवार डॉक्टर ऋतुजाताई चव्हाण यांना आरतीचा मान देण्यात आला यावेळी सहकुंटुब शेतकरी नेते डा. ज्ञानेश्र्वर टाले, डोणगांव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण,देवेंन्द्र आखाडे यांनी गणरायाची आरती केली.व राज्य सरकारला सद्बुध्दी देवो व शेतक-यांचे सोयाबीन-कापुस दरवाढ व पिक विमा,अतिवृष्टीची मदत देण्याची इच्छाशक्ती त्यांना देवो.अशी पार्थना गणरायाच्या चरणी केली.यावेळी मंडळाचे अध्यक्ष आकाश वायाळ,उपाध्यक्ष शिवाजी कुकडे,व सर्व सदस्य,गावकरी उपस्थित होते.

## दुधाळ जनावरांवर तिवा आजाराचे संकट वाढत असल्याने पशुपालक मात्र त्रस्त



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : संभाजीनगर जिल्ह्याभरात कधी घटसर्प, कधी फऱ्या, कधी लम्पी आजारानंतर आता दुधाळ जनावरांवर आजाराचे संकट घोंगावत आहे. दुधाळ जनावरांना डास मोठ्या प्रमाणात चावा घेत असल्याने तिवा आजार होत आहे. यामुळे जनावरांनी चारा खाणे बंद केले असून परिणामी दूध उत्पादनात घट होत आहे. यामुळे पशुपालक त्रस्त झाले आहेत. जिल्ह्यात सध्या अधून मधून पडणाऱ्या पावसामुळे ग्रामीण अथवा शहरी भागांत डासांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील जनावरे गोठ्यात ठेवतात. ओलसर जागा, सततचे पाणी व दमट वातावरणामुळे गोठे डासांचे आश्रयस्थान झाले आहेत. गोठ्यातील दुधाळ जनावरांना डास मोठ्या प्रमाणात चावा घेत असल्याने तिवा आजार मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दुधाळ जनावरे चारा पुरेशा प्रमाणात खात नसल्याने पुरेशा प्रमाणात दूध देत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यावर पशुसंवर्धन विभागाने पशुपालकांना योग्य ते मार्गदर्शन करणे सुरू केले असल्याचे पशुवैद्यकीय उपायुक्त यांनी सांगितले.

## गणेश मूर्तीच्या आगमनावेळी समाजकंटकांकडून दगडफेक, जहाद्यांचा उन्माद

भोपाळ: गणेश मूर्तीच्या आगमनावेळी काही समाजकंटकांनी दगडफेक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. हा प्रकार घटना मध्य प्रदेशातील मोचीपुरा येथे शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली होती. यावेळी हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्य़ेने नजीकचे पोलीस ठाणे गाठले असून समाज कंटकांविरोधात एफआयआरची मागणी केली आहे. यावेळी काही लोकांनी पोलीस ठाणे सभोवतालचा रस्ता आडवला होता.

पोलीस अधिकारी अभिनवकुमार बारंगे, औद्योगिक क्षेत्रातील राजेंद्र वर्मा हे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी उपस्थित लोकांशी घडलेला प्रकार लक्षात घेतला आणि चर्चा केली. उपस्थितांपैकी असलेल्यांनी सांगितले की, गणेशाच्या मूर्तीचे आगमन करत असताना काही समाजकंटाकांनी अंधाराचा फायदा घेत दगडफेक केली. तक्रार नोंदवत असताना भाविकांनी जय श्रीरामच्या घोषणा दिल्या होत्या. त्यांनी कारवाईची मागणी केली होती.याप्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल घेत त्यांनी आजूबाजूचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले होते. त्यावेळी संतप्त नागरिकांनी बराच वेळ पोलीस ठाण्याबाहेर घोषणाबाजी करत कारवाईची मागणी केली आहे. याप्रकरणासंदर्भात रात्री ११ वाजताच्या सुमारास अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला. य़ानंतर हिंदू लोकांनी निदर्शन संपवले आणि गणेश आगमनात पुन्हा सक्रिय सहभाग नोंदवला.

याप्रकरणात पोलिसांनी प्रसारमाध्यमाला सांगितले की, अज्ञात व्यक्तिविरूद्ध गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जात आहेत. याप्रकरणाची अधिक माहिती लवकरच हाती येईल.

## मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे ठिबक/ तुषार अनुदानाचे व सरसकट पीक विम्याचे पैसे मिळण्यासाठी बैलगाडी मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा** : शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजना अंतर्गत २५ टक्के अनुदान व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत ५५% अशा माध्यमातून शेतकऱ्यांना ठिबक तुषार खरेदीसाठी ८०% अनुदान मिळते. ठिबक व तुषार खूप महाग आहे एकरी ठिबकचा खर्च ५०००० ते ५५००० पर्यंत आहे व तुषार सिंचन ३५ हजारापर्यंत आहे. असे असताना अनुदान मिळते म्हणून शेतकरी ठिबक तुषार खरेदी करतात, काही शेतकऱ्यांनी नगदीने, काही शेतकऱ्यांनी उधारीने, काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून ठिबक तुषार खरेदी केलेले आहे. परंतु अजून दीड ते दोन वर्षे झाली तरी अनुदान मिळालेले नाही.



त्यामुळे शेतकऱ्यांना हे अनुदान मिळावे व काही शेतकऱ्यांची पिक विमा अर्ज रद्द केलेले आहे. रद्द केलेले अर्ज परत रिएक्टिव्ह करून सरसकट पीक विमा देण्यात यावा यासाठी ९ सप्टेंबर रोजी ट्रॅक्टर बैलगाडी मोर्चाचे नियोजन सिंदखेड राजा येथे महाविकास आघाडीच्या माध्यमातून व शेतकरी मित्र दिलीप चौधरी यांच्या प्रयत्नतून करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यातील व्यापारी व शेतकरी हजारो संख्येने उपस्थित राहणार आहे. मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेडराजा येथे धडकणार आहे निवेदनावर दिलीप चौधरी,बालाजी सोसे,सिद्ध जाधव,राजू अंभोरे,अनिल मेहेतरे,आरेफ खान पठाण यांच्या सह्या आहेत

## साहेब हिंस्त्र प्राण्यांची भीती नाही, परंतु माणसांची भीती वाटू लागली, आदिवासी मुलींनी मोर्चात मांडली व्यथा

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : चोपडा तालुक्यातील अल्पवयीन आदिवासी मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली.

या घटनेच्या निषेधार्थ चोपडा शहरात आज आदिवासी समाज बांधवांच्या वतीने मूक मोर्चा काढून आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. सदर मूक मोर्चा डॉ. चंद्रकांत बारेला यांच्या हॉस्पिटलपासून काढण्यात आला.

या मूक मोर्चामध्ये मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थिनी, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी झाले होते. चोपडा शहर पोलीस स्टेशन येथे मोर्चाला संबोधित करताना डॉ. चंद्रकांत बारेला यांचे अश्रू अनावर झाले.

यावेळी पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांना आरोपीला तात्काळ फाशी देण्यात यावी. या मागणीचे निवेदन देण्यात आलं. यावेळी मूक मोर्चा सहभागी झालेल्या आदिवासी मुलींनी सांगितलं. आम्हाला शेतात व समाजात वावरताना हिंस्त्र प्राण्यांसोबत भीती वाटत नाही. परंतु माणसांची भीती वाटू लागली असल्याचे यावेळी सांगितलं.



